**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **१८ व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी भारत सज्ज; पंतप्रधान मोदी करणार जगभरातल्या विविध नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा.**
2. **खाणकाम आणि ग्रीन स्टील हब बनण्याच्या दिशेने विदर्भाची वाटचाल सुरु असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
3. **विदर्भात सर्वत्र तान्हया पोळ्याचा उत्साह; नागपुरात ऐतिहासिक मारबत आणि बडग्या मिरवणुकीत अलोट गर्दी.**
4. **भंडारा जिल्ह्यात नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात ९ जणांचा मृत्यू.**

ब्रिक्स-आयोजन

भारताच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं उद्यापासून सुरु होत असलेल्या १८ व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी जगभरातले नेते एकत्र येणार असून, जागतिक कल्याणाचं उद्दिष्ट समोर ठेवून या परिषदेत विविध मुद्द्यांवर सकारात्मक आणि अर्थपूर्ण चर्चा होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मधून व्यक्त केला आहे. भारत मंडपम इथं होणाऱ्या या दोन दिवसीय शिखर परिषदेत ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, भारत, इराण, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिराती, यासारख्या अकरा प्रमुख उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्था एकत्र येत आहेत. 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी उभारणी' ही यंदाच्या ब्रिक्स शिखर परिषदेची संकल्पना आहे.

ब्रिक्स- द्विपक्षीय चर्चा

नवी दिल्लीत उद्यापासून सुरु होत असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभरातल्या विविध नेत्यांबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे परस्पर हिताच्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी पुतिन यांना प्राचीन तमिळ ग्रंथ 'तिरुक्कुरळ'चा रशियन अनुवाद भेट दिला. दरम्यान पंतप्रधान मोदी आज संध्याकाळी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन आणि संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांचीही भेट घेणार आहेत.

निर्मला सीतारामन GFF

सुरक्षा आणि ग्राहक हिताकडे दुर्लक्ष न करता नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केलं. मुंबईत ग्लोबल Fintech फेस्टच्या समारोप सत्रात त्या बोलत होत्या. AI ही दुधारी तलवार असल्याने तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेग कमी न करताना सुरक्षेची काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. जगभरातल्या वित्तीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याने CBDC ची चाचणी क्षमता वाढवण्याची सूचना त्यांनी रिझर्व बँकेला केली.

## मायनिंग/मुख्यमंत्री

विदर्भामध्ये मायनिंगच्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासाचे प्रमुख इंजिन बनण्याची क्षमता असून, 'विकसित भारत २०४७'मध्ये विदर्भ महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुढील २० वर्षांत खाण क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेत अर्धा ट्रिलियन डॉलरचे योगदान देऊ शकते आणि तीन कोटींपेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होऊ शकते, असं त्यांनी सांगितलं. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल चॅप्टरतर्फे आयोजित खाण अभियंत्यांच्या ३६व्या राष्ट्रीय अधिवेशनाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते .विदर्भात सुमारे पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि जवळपास ५० एमटीपीए पोलाद निर्मिती क्षमता विकसित होत असल्याचं त्यांनी नमूद केलं. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, गोंदिया आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये ग्रीन स्टील, स्वच्छ तंत्रज्ञान आणि सुधारित लॉजिस्टिक सुविधांमुळे मोठ्या आर्थिक संधी निर्माण होतील, असंही ते म्हणाले. दरम्यान, खाणकाम अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि शाश्वत करण्यासाठी एआय, ऑटोमेशन, ड्रोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर अधिवेशनात भर देण्यात आला. देशभरातून सुमारे ३०० प्रतिनिधी सहभागी झालेल्या या अधिवेशनात ४० तांत्रिक संशोधन निबंध सादर करण्यात येणार आहेत. अधिवेशनाचा समारोप उद्या १२ सप्टेंबर रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत होणार आहे.

## गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज मुंबईत One Tag या सुविधेची सुरुवात केली. यात fast tag portability ची सुविधा असून बँक खातं बदललं तरी जुन्याच fast tag ला ते सहज जोडण्याची सुविधा देण्यात आली आहे. राजमार्ग ॲप द्वारे ही सुविधा उपलब्ध करता येणार आहे. या सुविधेअंतर्गत चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत सर्व टोल नाक्यावर वाहनांना न थांबता टोल भरला जाईल अशी यंत्रणा कार्यान्वित होईल. त्यामुळे टोल नाक्यावरचा वाहनाचा वेळ १० सेकंद किंवा त्यापेक्षाही कमी होणार असल्याचं मंत्री गडकरी यांनी सांगितलं.

## बँक संप

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये आज देशव्यापी संप पुकारण्यात आल्याने बँकिंग सेवा प्रभावित झाल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी पाच दिवसांच्या कामाच्या आठवड्यावरून आणि पगाराशी संबंधित इतर मुद्द्यांवरून आंदोलन केलं. त्यामुळे ग्राहकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. मात्र, खासगी क्षेत्रातील बँकांच्या कामकाजावर या संपाचा परिणाम झाला नाही.

## बिहार पूरस्थिती

बिहारमधली पूरस्थिती अजूनही गंभीर असून, १४ जिल्ह्यांमधल्या ८५ तालुक्यांतले ४४ लाखांपेक्षा जास्त नागरिक पुरामुळे बाधित झाले आहेत. पूरग्रस्त भागात बचावकार्य सुरु असून, १ हजार ९४२ बोटी कार्यरत आहेत, तर ८१२ वैद्यकीय शिबिरं उभारण्यात आली आहेत. राज्यातल्या प्रमुख नद्यांची पाणी पातळी ओसरत आहे, तरीही, आठ नद्यांच्या बाबतीत अद्यापही धोका टळलेला नाही.

## मारबत महोत्सव (अँबियन्स साऊंड)

नागपूरच्या १४५ वर्षांच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा असलेल्या 'मारबत आणि बडग्या महोत्सवा'चे यंदाही उत्साहात आयोजन करण्यात आले. काळी आणि पिवळी मारबतची पूजा केल्यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली. यावेळी 'इडा-पीडा घेऊन जा गे मारबत'चा जयघोष करण्यात आला. वाईट प्रवृत्ती आणि अनिष्ट प्रथांवर प्रहार करणारे यंदाचे बडगे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. महानगरपालिकेच्या वतीने महोत्सवाच्या माध्यमातून 'प्लास्टिकमुक्त नागपूर' आणि स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. नागपूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या या उत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यंदाच्या मारबत सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, अभिनेते जॅकी श्रॉफ, दिग्दर्शक सुभाष घई, परदेशी पाहुणे देखील उपस्थित होते.गोंदियात देखील विविध भागांतून डीजे, ढोल-ताशांच्या गजरात मारबतींची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी काळी, पिवळी आणि केसरी रंगांच्या मारबतींसह राई, रुई, ढेकूळ, मोगसा आदी साहित्य घेऊन नागरिक सहभागी झाले. काही ठिकाणी १०० वर्षे, तर काही ठिकाणी ६५ वर्षांची परंपरा असलेल्या मारबतींची मिरवणूक काढण्यात आली. अखेरीस सर्व मारबती फुलचूर नाक्यावर नेऊन दहन करून विसर्जित करण्यात आल्या.

## तान्हा पोळा

विदर्भात आज सर्वत्र तान्हया पोळ्याचा उत्साह पाहायला मिळाला. बाल गोपाल, शाळकरी मुले-मुली आपले लाकडाचे सजवलेले नंदी घेऊन स्थानिक पोळ्यात सहभागी झाले. यवतमाळच्या पुनर्वसन दिघीत बालगोपालांचा तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. पंचवीस वर्षांपासूनची ही परंपरा कायम आहे. उत्कृष्ट सजावट केलेल्या बैलजोड्यांची निवड करून बालगोपालांना पारितोषिक देण्यात आले. तान्हया पोळ्याच्या माध्यमातून बालगोपालांना पारंपरिक कृषी संस्कृतीची ओळख करून देण्याच्या उद्देशाने या सणाची सुरुवात झाली होती.

## भंडारा अपघात

भंडारा जिल्हयात नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक परिसरात आज पहाटे एका पिकअप व्हॅनची ट्रकला धडक बसल्याने झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, तर ९ जण गंभीर जखमी झाले. हे सर्व प्रवासी छत्तीसगढमधले होते आणि धार्मिक कार्यासाठी पिकअप वाहनानं नागपूरकडे चालले होते. अपघातात ८ जण जागीच ठार झाले, तर एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृतांपैकी दोघांची ओळख अद्याप पटलेली नाही. जखमींवर उपचार सुरु असून पोलीस तपास सुरु आहे.

## दीक्षांत समारंभ

राष्ट्रीय अभियंता दिन आणि भारतरत्न सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त VNIT नागपूरचा २४ वा दीक्षांत समारंभ १५ सप्टेंबरला सकाळी ९ वाजता होणार आहे. नीती आयोगाचे सदस्य डॉ. आर. बालसुब्रमण्यम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी एकूण १ हजार ५४७ पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रांत ३४ पेटंट मिळाले असून ९४ संशोधन प्रकल्पांवर सध्या काम सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रकल्पांसाठीही संस्थेला अनुदान मिळाले असल्याची माहिती संचालक डॉ. प्रेम लाल पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान

आदिवासी विकास विभागातर्फे शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा आणि वसतिगृहांमध्ये १९ ते २६ सप्टेंबरदरम्यान सर्पदंश जनजागृती आणि प्रतिबंध अभियान राबविण्यात येणार आहे. सर्पमित्र, सर्पतज्ज्ञ, आरोग्य आणि  वन विभागाच्या सहकार्याने विद्‍यार्थ्यांना सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन आणि आपत्कालीन उपाययोजनांची माहिती दिली जाणार आहे.सर्पदंश झाल्यास तातडीने आरोग्य केंद्रात दाखल करण्याबाबत तसेच अंधश्रद्‍धा आणि गैरसमज दूर करण्यासाठी वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे. दरम्यान, अभियानात शाळा किंवा वसतिगृह परिसरात जिवंत साप आणून प्रात्यक्षिक करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.आपत्कालीन आरोग्य सुविधा, ASV उपलब्धता, वाहतूक व्यवस्था आणि स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक अद्‍ययावत ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## हवामान

हवामान! वर्धा, यवतमाळ आणि भंडारा जिल्ह्यांत पुढील दोन तासांत मेघगर्जनेसह वीजांचा कडकडाट, ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे आणि काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. दरम्यान, गोंदिया आणि वाशिम जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

*****